CNR NO.MHRT050005392011.

## रे.मु.नं.६२/२०११मधील नि.११८ वरील आदेश

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी नं. १ अ श्रीमती गंगाबाई धोंडु खडेकर या दि.२८/९/२०२० रोजी मयत झाल्या असुन त्यांन प्रतिवादी नं. १ ब ते १ ई असे वारस आहेत, या व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाही, त्यामुळे सदर प्रतिवादी नं. १ अ यांचे नावाला कंस करुन त्या अनुषंगाने दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी यासाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादीनी अर्जावर म्हणणे देवुन अर्ज मुदतीत नाही व मुदतीत नसल्यामुळे अर्ज अबेट झाला आहे. त्यामुळे अर्ज कायदयाने चालु शकणार नाही. तो फेटाळावा अशी विनंती केली आहे.

३. मी दाव्याचे अवलोकन केले. वादी, प्रतिवादी तर्फे सन्माननीय विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्याच्या कथनाच्या अनुषंगने युक्तीवाद केला.

४. या अर्जाच्या निर्णयासाठी खालील प्रश्न उपस्थित होतात. त्यावरील माझे निष्कर्ष व त्यांची कारणे नमुद केली आहेत ती खालीलप्रमाणे–

| | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी मागणीप्रमणे दावा दुरुस्तीबाबत आदेश मिळण्यास पात्र आहे काय ? | होकरार्थी. |
| २. | आदेश काय ? | अर्ज मंजुर करण्यात येतो. |

## कारणमांमिसा

**प्रश्न १ व २ करीताः–**

५. दावा वाटपासाठी आहे. प्रतिवादी नं. १अ हया दि.२८/०९/२०२० रोजी मयत झाल्या आहेत. याबाबत पक्षकारामध्ये दुमत नाही. प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे अर्ज मुदतीत नाही. परंतु प्रतिवादी नं. १ अ चे वारस पुर्वी पासुन १ब ते १ई येथे दाखल असल्याने व कोव्हीड १९ च्या पार्श्वभुमीवर देशात टाळेबंदी लागु असल्याने मुदतीचा कायदा वेळोवेळी परिपत्रकाद्वरे मा. उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयामार्फत शमीत केला असल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादीस कोणतीही तोषीस लागणार नाही. दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. न्यायाच्या व हिताच्या दृष्टीने अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे म्हणुन मी प्रश्न क्र. १ चे उत्तर होकारार्थी देवुन प्रश्न क्र. २ च्या उत्तराकरीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादीने या अर्जात मागणी केल्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करुन दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १८ ची पूर्तता करावी.

(आदेश खुल्या न्यायालयात पारीत केला.)

दिनांक : १२/१०/२०२१ ( पी. एस. जाधव )

ठिकाण : खेड सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर, खेड,

जि. रत्नागिरी.